5/6-70. Professor. J.V. Narlikar. 12

सकाळ : मंगळवार, १२ मे १९९२ / ९

# गेले ते उन्हाळ्याचे दिवस !

माझे बालपण उत्तर हिंदुस्थानात बनारसमध्ये गेले. मे-जून हे तेथील ऐन उन्हाळ्यातले दिवस; म्हणजेच सुट्टीचे पण. त्या उन्हाळ्याची मार्च मध्येच चुणूक दिसायला सुरवात होई. त्यामुळेच मार्च-एप्रिल म्हणजे सकाळच्या शाळेचे दिवस..... सकाळी साडे सहा ते अकरा पर्यंत. कारण एप्रिलपासून दुपारी घराबाहेर पडायची सोय नसे. कधी कधी वाटे, अशा विलक्षण उकाड्यात शाळेची दोन महिन्यांची लांबलचक सुट्टी कशाला! घराबाहेर हुंदडायचा वेळ म्हणजे सकाळी दहा ते संध्याकाळी पाच. हा नेहमी शाळेच्या वेळेने बळकावलेला असे. तो आता आम्हाला सुट्टीत हवा तसा वापरायला मिळाला होता खरा ! पण उपयोग काय ?

## थोरांचे बालपण



इतका भयानक उन्हाळा, की नेमक्या त्या तासांत घरात वाळ्याचे पडदे लावून बसण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

आता घरबसल्या वेळ घालवायचा कसा ?

कादंबऱ्या आणि साहस कथा वाचून ?

पत्ते आणि बुद्धिबळ - कॅरम किंवा बॅगॅटेल खेळून ?

का भेंड्या लावून आणि आपापसातल्या भांडणात ?

हे सर्व प्रकार करूनही वेळ उरत असे ! कारण त्या वेळी टी. व्ही. नव्हता, व्हिडिओ नव्हता, कॉमिक्स नव्हती. फार काय, आजकालच्या स्कॉलर लोकांना बांधून ठेवणारे उन्हाळी क्लासेस पण नव्हते. मग आम्ही दोघा भावांनी वेळ कसा घालवावा ?

पण उन्हाळ्याच्या सुट्टीतील वेळ वाया जाऊ नये म्हणून आमच्या आई वडिलांनी काही तोडगे शोधून काढले होते. उदाहरणार्थ एखादी कला शिकावी या हेतूने संगीत, चित्रकला आणि मूर्तिकला शिकवण्याची योजना केली. बनारस हिंदू विद्यापीठाच्या आवारातच आम्ही राहात असल्याने या विषयांचे शिक्षक मिळायला त्रास होत नसे. मुख्य म्हणजे या सर्वांसाठी सराव लागतो. केवळ शिक्षकाबरोबर घालवलेल्या तासांव्यतिरिक्त स्वत: सराव करायची पण जरूर भासते आणि तेथे फावला वेळ उपयोगी पडतो.

गणितात माझी रुची पाहून मला माझ्या वडिलांनी गणिताचा वापर असेल अशा कोड्यांची, मनोरंजनाची पुस्तके आणून दिली. 'बहुरंगी करमणूक' हे मराठी पुस्तक मी उन्हाळ्याच्या सुट्टीत वाचले. गणिताप्रमाणेच मला संस्कृतची गोडी होती (अजूनही आहे). तिला खतपाणी घातले माझ्या आईने. कालिदास, भवभूती सारख्यांच्या वाङ्मयातले काही उत्कृष्ट नमुने आईच्या मार्गदर्शनाखाली वाचले आणि

डॉ. जयंत नारळीकर पुणे.

त्यांचे रसग्रहण करण्यास शिकलो.

आणि पुस्तके 'वाचून दाखविणे' हे वैशिष्ट्य पण आईचेच. आम्ही स्वत: वाचू लागण्याआधीपासून पाश्चात्य विनोदी वाङ्मयाची आणि मराठी ऐतिहासिक कादंबऱ्यांची भरपूर ओळख आम्हा दोघांना झाली ती आईकडून

वडिलांनी खास मुंबईहून आणलेल्या हापूस आंब्यावर आणि चिक्कूच्या करंडीवर आमच्या उड्या पडत तशाच त्यांनी आणलेल्या कादंबऱ्यावरही !

अशा तऱ्हेने बाहेर गरम वारे (लू) वाहात असताना वाळ्याच्या पडद्याआड हे सुट्टीचे दिवस कसे गेले ते कळत नसे ! आणि एक दिवस गडगडाट होऊन पहिला पाऊस पडे. पावसाचे पाणी (असल्यास गारांसकट) एका भांड्यात गोळा करून त्याचा चहा करणे हा आमचा पर्जन्यराजाला पहिला मुजरा असे. त्या पावसापाठोपाठ येणाऱ्या थंडाव्याचे स्वागत करताना मन थोडे अस्वस्थ होई कारण....

उन्हाळा गेला - त्यापाठोपाठ आता उन्हाळ्याची सुट्टी पण जाणार आणि परत शाळेचे रहाटगाडगे सुरू होणार !